दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hindupraksashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

नाशिकमध्ये दुष्काळामुळे पशुधनाच्या चारा संकटाचे सावट

नाशिक : जिल्ह्यातील दहा तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाल्यानंतर आता शेतीपिकांसोबतच पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. पावसातील मोठ्या खंडाचा परिणाम खरीप पिकांवर झाला असून, त्याचा थेट परिणाम हिरवा आणि कोरडा चारा उपलब्धतेवर होणार आहे. प्रशासनाच्या आकडेवारीनुसार, ऑगस्टअखेर उपलब्ध असलेला चारासाठा पुढील दोन ते तीन महिन्यांसाठीच पुरेसा ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे जानेवारीपासून चारा टंचाई निर्माण होण्याची चिन्हे असून, २०२७ च्या उन्हाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

देवीची मूर्ती घेऊन जाताना भीषण अपघात, 7 जणांचा मृत्यू

अमरावती : जिल्ह्यातील धामणगाव रेल्वेजवळ शुक्रवारी पहाटे समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला. या अपघातात 7 जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच 18 जण जखमी झाले आहेत. वर्धा येथील सिंदी मेघे परिसरातील सार्वजनिक दुर्गा पूजा उत्सव समितीचे 25 ते 30 कार्यकर्ते टेम्पो-पिकअप वाहनाने शेगाववरून दुर्गा माता मूर्ती घेऊन वर्ध्याकडे परतत होते. तेव्हा बोलेरो पिकअप वाहनाला मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, वाहनाचा चक्काचूर झाला. गाडीतील काही कार्यकर्ते थेट महामार्गाच्या बाजूला फेकले गेले.

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. ०३ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १६२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

अहिल्यानगरमध्ये सात ठिकाणी 5,860 हृदय तपासण्या

अहिल्यानगर: मणिपाल हॉस्पिटल्सच्या नेटवर्कमधील साईदीप सह्याद्री हॉस्पिटलतर्फे जागतिक हृदय दिनानिमित्त अहिल्यानगरमधील सात ठिकाणी ५,८६० मोफत ईसीजी तपासण्या करण्यात आल्या. “२४ हौर्स. वन सिटी. वन हार्ट मिशन ” या संकल्पनेअंतर्गत २४ तास राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा “मैक्सिमम कार्डियक स्क्रीनिंग इन २४ हौर्स ” या श्रेणीतील विक्रम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.या उपक्रमांतर्गत साईदीप सह्याद्री हॉस्पिटल, आगडगाव, पोलीस मुख्यालय, ट्रॅकटन/हॉटेल अकाया, शेंडी, सुपा एमआईडीसी , नगर एमआईडीसी आणि [सातवे ठिकाण] येथे एकाच वेळी ईसीजी तपासण्या करण्यात आल्या. प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली होती. या उपक्रमासाठी १०० ईसीजी मशीन आणि १०० परिचारिका व परिचारक तैनात करण्यात आले होते.

घडी डिटर्जंटच्या नव्या ‘विश्वास की परीक्षा’ द्वारे पुढचे पाऊल

मुंबई : आरएसपीएल ग्रुपने आज घडी डिटर्जंटची नवी मोहीम “विश्वास की परीक्षा” लाँच केल्याची घोषणा केली. या मोहिमेत बॉलिवूड सुपरस्टार माधुरी दीक्षित ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सहभागी झाल्या आहेत. “विश्वास की खास बात ये है कि, उसपर हमेशा खरा उतरना पड़ता है” - या विश्वासावर आधारित ही मोहीम तयार करण्यात आली आहे. विश्वासाविषयीची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यावर नेहमी खरे उतरावे लागते. हाच संदेश देत ही मोहीम, ब्रँडवर विश्वास ठेवणाऱ्या भारतातील लाखो कुटुंबांसाठी उत्पादनाचा अनुभव सातत्याने अधिक चांगला करण्याच्या घडीच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.

ब्रिजस्टोन इंडिया'च्या वतीने नवीन सिलेक्ट स्टोअर सुरु

नाशिक : महाराष्ट्रात आपल्या किरकोळ विक्रीचा विस्तार करत, जपानची समूह कंपनी ब्रिजस्टोन कॉर्पोरेशनच्या ब्रिजस्टोन इंडियाच्या वतीने नाशिकमध्ये नवीन ब्रिजस्टोन सिलेक्ट स्टोअरचे उद्घाटन करण्यात आले. सिलेक्ट स्टोअर, हिंदुस्तान टायर्स आणि ऑटो केअरचा पत्ता 48/4, नारायण बापू चौक, जुना सैखेडा रोड, अभिनव आदर्श शाळा समोर, जेलरोड, नाशिक याप्रमाणे आहे. ब्रिजस्टोन सिलेक्ट स्टोअर्सची रचना ग्राहकांना एकाच छताखाली संपूर्ण टायर आणि व्हील केअरचा अनुभव देण्यासाठी करण्यात आली आहे. प्रीमियम टायरसह, ग्राहक तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आधुनिक उपकरणे आणि सुरक्षा, आरामदायी आणि दीर्घकालीन कामगिरीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या सेवांची अपेक्षा करू शकतात.

एपीएसईझेडच्या कोलंबो वेस्ट टर्मिनलची क्षमता दुप्पट

मुंबई : श्रीलंकेच्या पंतप्रधान डॉ. हरिनी अमरसूर्या यांनी आज अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन (एपीएसईझेड)च्या कोलंबो वेस्ट इंटरनॅशनल टर्मिनल (सीडब्ल्यूआयटी) च्या 750 दशलक्ष अमेरिकी डॉलरच्या फेज-II विस्ताराचे उद्घाटन केले. या विस्तारामुळे सीडब्ल्यूआयटीची क्षमता 1.6 दशलक्ष टीईयूवरून वाढून 3.2 दशलक्ष टीईयू झाली आहे. या विस्तारामुळे 2028 पर्यंत कोलंबो बंदराच्या 13 दशलक्ष टीईयू क्षमतेच्या उद्दिष्टापैकी जवळपास 25% माल हाताळण्याची सीडब्ल्यूआयटीची क्षमता आणखी मजबूत होईल.

बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम क्षमतेपैकी 50% पेक्षा जास्त वाटा

मुंबई : भारतातील सर्वात मोठी अक्षय ऊर्जा कंपनी असलेल्या, अदाणी ग्रीन एनर्जी लिमिटेड'ने (एजीईएल), गुजरातमधील खावडा येथे कार्यरत बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम (बीईएसएस) ची क्षमता 6.63 गिगावॅट-तास (गिगावॅट-तास) पर्यंत वाढवली आहे. जून 2026 मध्ये ही क्षमता 3.55 गिगावॅट-तास होती. भारतातील सुमारे 12.6 गिगावॅट-तास कार्यरत बीईएसएस क्षमतेपैकी आता एजीईएलचा वाटा 50% पेक्षा जास्त आहे. या महत्त्वपूर्ण कामगिरीमुळे खावडा हे एकाच ठिकाणी कार्यरत असलेले जगातील सर्वात मोठे बॅटरी एनर्जी स्टोरेज केंद्र ठरले आहे.


30 सप्टेंबरपासून खुला इव्हेंशनचा आयपीओ

मुंबई : इव्हेंशन लिमिटेड आयपीओ शेअर बाजारात आयपीओ गुंतवणुकीच्या संधी शोधणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी महत्त्वाची बातमी आहे.एमआयसीई आणि कॉर्पोरेट इव्हेंट्स क्षेत्रात कार्यरत असलेल्या इव्हेंशन लिमिटेड चा आयपीओ 30 सप्टेंबर 2026 रोजी खुला होणार आहे. रिटेल इन्वेस्टर्स साठी किती गुंतवणूक? या आयपीओचा मार्केट लॉट 1,200 शेअर्सचा आहे. रिटेल इन्वेस्टर्स ना किमान 2 लॉटसाठी अर्ज करावा लागणार आहे. म्हणजेच 118 रुपये या अप्पर प्राइस बँडनुसार किरकोळ गुंतवणूकदारांना किमान 2.83 लाख रुपये गुंतवावे लागतील.

चालकाच्या निष्काळजीपणामुळे अख्खं कुटुंब उद्ध्वस्त; पती-पत्नीसह चिमुकला ठार, तो फरार चालक अखेर सापडला!

छत्रपती संभाजीनगर: समृद्धी महामार्गावर निष्काळजीपणे इंडिकेटर न देता अचानक लेन बदलून कारमधील एकाच कुटुंबातील तिघांचा बळी घेणाऱ्या त्या फरार कंटेनरचा आणि चालकाचा शोध घेण्यात दौलताबाद पोलिसांना यश आले आहे. अपघाताच्या तीव्रतेनंतर घटनास्थळावरून कंटेनरसह पसार झालेल्या या वाहनाची ओळख पटली असून, पोलिसांनी चालकासह वाहन मालकावर गुन्हा दाखल केला आहे. या भीषण अपघातात जालन्यातील वकील रामकिशन जगदाळे यांच्या कुटुंबातील तीन जणांचा दुर्दैवी अंत झाला होता.

या हृदयद्रावक अपघाताप्रकरणी ॲड. रामकिशन अंबादास जगदाळे (वय ५६, रा. जालना) यांनी दिलेल्या तक्रारीवरून दौलताबाद पोलीस ठाण्यात कंटेनर चालक आणि नोंदणीकृत मालकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. अपघाताच्या वेळी कंटेनरच्या पाठीमागे वाहनांच्या सुरक्षेसाठी



नियमानुसार सुरक्षा बार बसवलेले नसल्याचेही तपासात उघडकीस आले आहे.

इंडिकेटर न देता लेन बदलल्याने घडला होता भीषण थरार

समृद्धी महामार्गावरून नाशिककडून नागपूरच्या दिशेने जात असताना भरधाव कंटेनरच्या चालकाने कोणतीही पूर्वसूचना किंवा इंडिकेटर न देता अचानक लेन बदलली. त्यामुळे पाठीमागून वेगात येणारी कार थेट कंटेनरच्या मागील भागात जाऊन जोरदार आदळली. हा अपघात इतका भीषण होता की कारचा पूर्णपणे चक्काचूर झाला. यात कारचालक प्रतीक रामकिशन जगदाळे, त्यांची पत्नी श्रेया प्रतीक जगदाळे आणि त्यांचा चिमुकला मुलगा रुद्रांश प्रतीक जगदाळे या तिघांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

अपघात घडल्यानंतर कायदेशीर कारवाईच्या भीतीने कंटेनर चालकाने वाहनासह महामार्गावरून पळ काढला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून दौलताबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तातडीने तपासाची चक्रे फिरवली. महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदारांच्या आधारे पोलिसांनी गुजरात पासिंगच्या या कंटेनरची ओळख पटवली आहे.

‘UCC’च्या माध्यमातून एका समाजाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न : असदुद्दीन ओवेसी

मतदारांची नावे वगळण्यावरुन ओवेसींचा निवडणूक आयोगावर संताप

छत्रपती संभाजीनगर : समान नागरी कायद्याच्या (युसीसी) माध्यमातून भाजप एका विशिष्ट समाजाला ‘टार्गेट’ करण्याचा प्रयत्न करीत आहे. भाजपचे ज्या राज्यांमध्ये सरकार आहे, तेथे हे मनसुबे असून, यामध्ये विविध जातींचा समावेश का करण्यात येत नाही, असा प्रश्न एमआयएम पक्षप्रमुख खा. असदुद्दीन ओवेसी यांनी येथे उपस्थित केला.

गुरूवारी सायंकाळी माध्यमांसोबत बोलताना ते म्हणाले की, युसीसीच्या आड भाजपला हिंदू राष्ट्र बनवायचे आहे. याच माध्यमातून हिंदू विवाह कायदा थोपविण्यात येत आहे. संविधानात हे कुठेही बसत नाही. इंडिया आघाडीत सामील होण्याच्या मुद्यावर ओवेसी म्हणाले



की, दरी निर्माण करण्यासाठी आम्ही सामील होणार नाही. मुस्लिम नेतृत्व मजबूत करण्याचा मुद्दा असेल तर आम्ही विचार करू.

२ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात येणाऱ्या आंदोलनाच्या मुद्यावर आपली भूमिका मांडताना ते म्हणाले की, आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे. महाराष्ट्रात सुरू असलेल्या एसआयआरच्या मुद्यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. सुरुवातीपासून आम्ही याचा विरोध करतोय. अनेक मतदार मरण पावले, पत्ता बदलला इ. कारणे दाखवून त्यांची नावे कमी केली जात आहेत. निवडणूक आयोग कारण नसताना नागरिकांना त्रास देत आहे. एसआयआरसाठी लांबलचक रांगा लागत आहेत. या प्रक्रियेला आमचा विरोध होता आणि राहणारच आहे. उत्तर प्रदेश येथील निवडणुकीसाठी इंडिया आघाडीने सन्मानाने बोलावले तर निश्चित आम्ही जाणार आहोत.

इंडिया आघाडी नेहमी आमच्यावर आरोप करते की, यांच्यामुळे आमचा पराभव झाला. आता मतांची चोरी झाली म्हणून पराभव झाला असे सांगत आहेत. त्यांना ठरवावे लागेल की, त्यांचा पराभव नेमका कोणामुळे झाला. पत्रकार परिषदेत प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील, जिल्हाध्यक्ष शारेख नक्षबंदी, विरोधी पक्षनेता अब्दुल समीर आदी उपस्थित होते.

नगरसेवक चांगले काम करीत आहेत

शहरात ३६ नगरसेवक निवडून आले आहेत. ते चांगले काम करीत आहेत. रोशनगेट येथील जिनिंगच्या जागेवर मैदान तयार केले जात आहे. इम्तियाज जलील यांना पराभूत करणाऱ्यांना भाजपने मनपात मोठा कक्ष दिला. आम्हाला कक्षाची गरज नाही, आम्ही जनतेच्या मनात आहोत. जलील पुन्हा लोकसभेला निवडून येतील असेही ओवेसी यांनी सांगितले.

प्रसुतीचा खर्च करण्यास नकार आणि गर्भवतीचा गेला बळी



छत्रपती संभाजीनगर : येथून मन सुन्न करणारी आणि तितकीच संतापजनक घटना समोर आली आहे. गर्भवती महिलेवर उपचार करण्यास उशीर झाल्याने महिलेचा आणि तिच्या पोटातील अभ्रकाचा मृत्यू झाला. छत्रपती संभाजीनगर येथील पैठण तालुक्यातील विहामांडवा येथे ही घटना घडली. स्वाती उर्फ समीक्षा विशाल निंबाळकर असं या मृत महिलेचं नाव असून सासरच्या मंडळींनी उपचारात अढमुठेपणा केल्याने तिला स्वतःचा आणि हे जग सुद्धा न बघितलेल्या आपल्या बाळाचा जीव गमवावा लागला.

६ सप्टेंबर रोजी नऊ महिन्यांची गर्भवती असलेल्या समीक्षाची प्रकृती खालावली. यामुळे तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. यादरम्यान तिची शारीरिक स्थिती चांगली नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पोटातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने तसेच बाळाची नाळ ही बाळाच्या गळ्याभोवती आवळली गेल्याने डॉक्टरांनी सीझर डिलेव्हरी करण्याचा सल्ला दिला. परंतु समीक्षाच्या सासरच्यांनी प्रसूतीसाठी लागणारा खर्च करण्यास नकार दिला. समीक्षासाठी तिचं माहेर धावून आलं. परंतु माहेरची माणसं खर्च करण्यास तयार असूनदेखील समीक्षाच्या सासू सासऱ्यांनी तिला रुग्णालयात दाखल होऊ दिले नाही. अधिक संतापजनक बाब म्हणजे, समीक्षाचा नवरा म्हणजेच विशालदेखील समीक्षाच्या बाजूने उभा राहिला नाही.

समीक्षाची तब्येत अधिकच बिघडत चालल्याने अखेर तिला २५ सप्टेंबर रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, तपस सुरु होण्यापूर्वीच डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. सासरच्यांचा अढमुठेपणामुळे समीक्षाचा नाहक बळी गेला. या घटनेने संपूर्ण परिसरात शोक व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी समीक्षाचा पती विशाल निंबाळकर, सासरे अनिल निंबाळकर, सासू शारदा आणि नणंद ऐश्वर्या निंबाळकर यांच्यावर पाचोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून या प्रकरणी अधिक तपास सुरु आहे. या प्रकरणामुळे निंबाळकर कुटुंबाचा निर्दयीपणा उघड झाला आहे. याआधी समीक्षाला सासरकडून मानसिक किंवा शारीरिक त्रास होतो आहे का? याची चौकशी पोलिस करणार आहेत.

हिंगोली शहरातील प्रलंबित प्रॉपर्टी कार्डसाठी निहाल भैय्या यांचा पाठपुरावा सुरू

814.48 हेक्टर क्षेत्रातील सुमारे 4193 मिळकतींच्या मोजणीचा प्रस्ताव; नगर परिषद व भूमी अभिलेख विभागाकडून पत्रव्यवहार

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली : हिंगोली शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रॉपर्टी कार्डच्या प्रश्नासाठी निहाल भैय्या यांच्याकडून पुढील पाठपुरावा सुरू आहे. शहरातील भू-नकाशाअंतर्गत विस्तारित क्षेत्रातील मिळकतींची मोजणी करून प्रॉपर्टी कार्ड तयार करण्याच्या दृष्टीने नगर परिषद, भूमी अभिलेख विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

या संदर्भात हिंगोली नगर परिषदेकडून दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी उपअधीक्षक, भूमी अभिलेख, हिंगोली यांना पत्र देण्यात आले आहे. या पत्रात भू-नकाशाअंतर्गत विस्तारित क्षेत्रातील मिळकतींची मोजणी करून पुढील कार्यवाही करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

उपलब्ध कागदपत्रांनुसार संबंधित यादीमध्ये एकूण ८,१४४,८०५.७ चौ.मी. म्हणजेच ८१४.४८ हेक्टर क्षेत्र असून, त्यामध्ये अंदाजे ४,१९३



मिळकतींचा समावेश आहे. या यादीत हिंगोली शहरातील विविध भाग व क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

दरम्यान, उपअधीक्षक, भूमी अभिलेख, हिंगोली कार्यालयाकडून दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी हिंगोली नगर परिषदेला पत्र देण्यात आले आहे. त्यामध्ये प्रस्तावित क्षेत्रातील स.नं.ची यादी, प्रस्तावित नकाशा आणि त्याअंतर्गत असलेल्या एकूण मिळकतींची संख्या नगर परिषदेकडून उपलब्ध करून देण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. तसेच उपलब्ध माहितीच्या आधारे मोजणी व पुढील कार्यवाहीबाबत प्रक्रिया पुढे नेण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

नगर परिषदेकडून यापूर्वी करण्यात आलेल्या पत्रव्यवहारातही संबंधित क्षेत्रांची माहिती, KML फाईल तसेच नगर भू-मापन झालेल्या क्षेत्राबाबतची माहिती भूमी अभिलेख विभागाकडे सादर करण्यात आल्याचे नमूद आहे.

या सर्व पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने निहाल भैय्या यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय आणि हिंगोली नगर परिषद येथे प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी प्रलंबित प्रॉपर्टी कार्डचा प्रश्न, नागरिकांच्या मालमत्तेचे दस्तऐवजीकरण आणि पुढील मोजणी प्रक्रियेबाबत माहिती घेण्यात आली.

यावेळी हिंगोली नगर परिषदेच्या मुख्याधिकारी प्रांजली मुंडे, उपअधीक्षक भूमी अभिलेख प्रमोद रामदास माळी तसेच नगर परिषदेचे टाऊन प्लॅनर मोहेकर यांच्याशी संबंधित प्रक्रियेबाबत चर्चा करण्यात आली. प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध झाल्यास संबंधित मालमत्तेची नोंद व हक्काचे दस्तऐवजीकरण करण्याच्या प्रक्रियेला मदत होणार आहे. त्यामुळे या प्रश्नाच्या पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून पाठपुरावा सुरू ठेवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

८१४.४८ हेक्टर क्षेत्र आणि सुमारे ४१९३ मिळकतींचा विषय असल्याने ही प्रक्रिया व्यापक असून, मोजणी व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पुढील टप्प्यात प्रॉपर्टी कार्ड प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून दुष्काळी स्थितीची पाहणी



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : दुष्काळी स्थितीच्या तीव्र पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेकटा मंडळात प्रत्यक्ष जाऊन पिकांच्या दुरावस्थेची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यादरम्यान त्यांच्यासोबत आमदार अनुराधाताई चव्हाण, आमदार नारायण कुचे, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकटेश राठोड, तहसीलदार शिवानंद बिडवे यांच्यासह स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दौऱ्याच्या निमित्ताने मंत्र्यांनी शेकटा मंडळातील गाढे जळगाव येथील गट नंबर ३७६ मधील मंजूर उस्मान खान पठाण या शेतकऱ्याच्या शेताला भेट दिली. तेथील सोयाबीन पिकाची पाहणी केली असता, पाण्याअभावी संपूर्ण पीक पूर्णपणे करपून नष्ट झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या बिकट परिस्थितीवर भाष्य करताना महसूल मंत्री म्हणाले की, शासनाने यापूर्वीच तात्काळ पंचनामे करण्याचे स्पष्ट आदेश दिले असून महसूल व कृषी विभागाची संपूर्ण यंत्रणा सध्या प्रत्यक्ष पाहणी करून पंचनाम्याचे काम वेगाने करत आहे. अचूक पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला कसा मिळवून देता येईल, यासाठी राज्य शासन पूर्णपणे कटिबद्ध आहे. तसेच, हा मदतीचा मोबदला शेतकऱ्यांना लवकरात लवकर मिळावा, यासाठी शासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत, अशी ग्वाही बावनकुळे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना दिली.

शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेचे पंचायत समितीसमोर उपोषण

समस्या सोडविण्याचे प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आश्वासन; आश्वासनानंतर उपोषण तात्पुरते स्थगित

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण /रायगड / महात्मा गांधी जयंतीनिमित्त उरण पंचायत समितीसमोर शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी उपोषण सुरू करण्यात आले आहे. विस्थापित कुटुंबांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधून त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

संघटनेने प्रशासनाला दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की ग्रामपंचायतीच्या हद्दीबाहेर असलेल्या काही कुटुंबांना वैयक्तिक नळ कनेक्शनच्या खर्चासाठी ओएनजीसी कंपनीच्या सी एस आर निधीतून निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित ग्रामसेवक, प्रशासकीय ग्रामपंचायत हनुमान कोळीवाडा व गटविकास अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.



हनुमान कोळीवाडा गावातील मुख्य पाणीपुरवठा लाईनवरून बाहेरील कुटुंबांना देण्यात आलेली कनेक्शने तात्काळ बंद करावीत अशी मागणी करण्यात आली आहे . तसेच कथितरीत्या विनापरवानगी दुसऱ्या आळीच्या पाणीपुरवठा लाईनवरून नळ कनेक्शन घेतल्याचा आरोप संघटनेने केला असून, या प्रकरणाची चौकशी करून दोष आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामनिधीत आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार केल्याचा आरोपही संघटनेने केला असून, या प्रकरणाची चौकशी करून शासनाच्या निर्णयानुसार कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने वैयक्तिक लक्ष घालून मा. उच्च न्यायालयाचे WP NO.8655 OF 2025 चे दि.२९/०४/२०२६ व ३०/०९/२०२६ रोजीचे आदेशानुसार संक्रमण शिबिराची पाणी पुरवठ्याची १.७ कि. मि. लांबीची व ४ इंच व्यासाची मुख्य पाइप लाइन नवीन टाकावी व नागरी सुविधा द्याव्यात. मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.अशी मागणी करण्यात आली आहे.संघटनेने विविध मागण्यांवर प्रशासनाने तातडीने दखल घेऊन नियमानुसार चौकशी व कार्यवाही करावी, अशी भूमिका घेतली आहे.

"विस्थापित कुटुंबांच्या प्रश्नांवर प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि मागण्यांवर नियमानुसार कार्यवाही करावी," अशी मागणी शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेने केली आहे.यावेळी शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेचे पदाधिकारी कल्याणी परमानंद कोळी,उज्वला रमेश कोळी,आरती जयेश कोळी,जनाबाई मोतीराम कोळी,अलका दत्तराम कोळी,

नंदा सुरेश कोळी,जयश्री विश्वनाथ कोळी,सुरेखा दत्ता कोळी,अमृता किर्ती कोळी,अस्मिता अमित कोळी, भारती जगदीश शेवेकर व इतर महिला पदाधिकारी,ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेच्या उपोषणाची दखल घेत उरण पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सर्जेराव पाटील,सभापती महेश म्हात्रे,उपसभापती परेश ठाकूर यांनी सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करत समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. व कोणावरही अन्याय होणार नाही याची हमी दिली.प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी नंतर व आश्वासना नंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले.

हिमालयीन रॉक सॉल्टला वेगळे ठरवणाऱ्या बाबी

मुंबई : रॉक सॉल्ट (सेंधव मीठ) फार पूर्वीपासून भारतीय परंपरेचा भाग राहिले आहे. आयुर्वेदात नैसर्गिक गुणधर्मांसाठी त्याला विशेष महत्त्व दिले गेले आहे. अलिकडच्या काळात, ग्राहक आपल्या आहाराबाबत अधिक जागरूक झाल्यामुळे दैनंदिन स्वयंपाकात रॉक सॉल्टचा वापर लक्षणीयरित्या वाढला आहेटाटा सॉल्ट हिमालयन रॉक सॉल्टच्या नुकतेच झालेल्या प्रयोगशाळा तपासणीत स्पष्ट झाले आहे की, ते लागू असलेल्या सर्व गुणवत्ता आणि सुरक्षितता मानकांचे पूर्णपणे पालन करते, तसेच यामध्ये कोणत्याही कृत्रिम अन्न रंगांचा अभाव असल्याचे निष्पन्न झाले आहे, ज्यामुळे ग्राहकांसाठी या उत्पादनाच्या शुद्धतेची खात्री मिळते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

ज्ञानेश्वरीची ज्ञानपरंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञान

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून सादर करण्यात आलेला 'ज्ञानरंग' उपक्रम आणि 'ज्ञानेश्वरी' ॲपचे लोकार्पण हे मराठी भाषा आणि संस्कृतीच्या समृद्ध वारशातील एक सुवर्णपान ठरले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, ज्ञानेश्वरी ही केवळ भूतकाळातील रचना नसून ती काल, आज आणि उद्याही मानवजातीला दिशा दाखवणारा शाश्वत ज्ञानदीप आहे. काळाचा संदर्भ बदलला किंवा परिस्थिती बदलली, तरी ज्ञानेश्वरीतील अध्यात्मिक व जीवनविषयक मूल्यांचे महत्त्व अबाधित राहते, हा विचार नवी प्रेरणा देणारा आहे. आजच्या आधुनिक आणि अत्यंत धावपळीच्या युगात तरुण पिढीला आपल्या या अमूल्य वैचारिक व सांस्कृतिक ठेव्याशी जोडून ठेवणे हे एक मोठे आव्हान बनले होते. या पार्श्वभूमीवर, भक्ती, ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा त्रिवेणी संगम साधत 'ज्ञानरंग - ज्ञानेश्वरी' या मोबाईल ॲपची निर्मिती करणे हा एक स्तुत्य व अत्यंत कालसुसंगत उपक्रम आहे. ॲपच्या माध्यमातून माऊलींच्या ओव्यांचे दैनंदिन वाचन, अर्थ समजून घेणे आणि युट्यूबच्या माध्यमातून 'संपूर्ण ज्ञानेश्वरी श्रवण' करण्याची सोय उपलब्ध करून दिल्यामुळे हा ज्ञानठेवा आता जागतिक स्तरावर सहजरित्या पोहोचू शकेल. भारताच्या ज्ञानपरंपरेचा हा अनमोल संदेश जगभरातील जिज्ञासूंपर्यंत आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. अभिजात दर्जा प्राप्त झालेल्या मराठी भाषेतील हा अभूतपूर्व वाङ्मयीन ठेवा तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रत्येकाच्या हातात आणि मनात पोहोचवणे, हा खऱ्या अर्थाने माऊलींच्या विचारांचा सन्मान आहे. सरसंघचालकांनी आवाहन केल्याप्रमाणे, ज्ञानेश्वरीतील किमान एक तरी ओवी प्रत्येकाने आपल्या रोजच्या आयुष्यात अनुभवून आचरणात आणल्यास समाज अधिक समृद्ध, संवेदनशील आणि मूल्याधारित बनेल यात शंका नाही.

अस्थी नदीत विसर्जित करण्याऐवजी स्मृतींचे झाड लावू या!

दु:खाला पर्यावरणाची दिशा आणि आठवणींना हिरवीगार सावली देण्याची वेळ आली आहे

माणूस या जगातून निघून जातो, पण त्याच्या आठवणी कधीच मरत नाहीत. आईच्या हातचा स्वयंपाक, वडिलांचा कडक शिस्तीचा धडा, भावाच्या खांद्यावरची साथ, बहिणीचे निरपेक्ष प्रेम, पत्नीची आयुष्यभराची सोबत, मुलाच्या चेहऱ्यावरचे निरागस हास्य... माणूस जातो, पण त्याच्याशी जोडलेल्या आठवणी आपल्या मनात कायम जिवंत राहतात. म्हणूनच आपल्या प्रिय व्यक्तीच्या स्मृती जपण्याची प्रत्येकाची धडपड असते. मात्र या स्मृती जपण्याची पद्धत काळानुसार बदलण्याची गरज आहे कां? हा प्रश्न आज पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर गंभीरपणे विचारला पाहिजे. प्रचलित परंपरेनुसार अंत्यसंस्कारानंतर अस्थी नदीमध्ये विसर्जित केल्या जातात. या प्रथेमागे श्रद्धा, भावना आणि सांस्कृतिक परंपरा आहेत. त्या भावनांचा अवमान करण्याचा प्रश्नच नाही. मात्र श्रद्धा आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष निर्माण होऊ नये, यासाठी पर्यावरणपूरक पर्याय शोधणे ही काळाची गरज आहे. प्रिय व्यक्तीच्या स्मृतीसाठी नदीत अस्थी विसर्जित करण्याऐवजी एखादे झाड लावले, तर त्या व्यक्तीची आठवण एका दिवसापुरती किंवा एका विधीपुरती मर्यादित न राहता वर्षानुवर्षे जिवंत राहू शकते. ही कल्पना केवळ पर्यावरणाचा विचार करणारी नाही, तर ती भावनेला नवा अर्थ देणारी आहे.

कल्पना करा, एखाद्या आईच्या स्मृतीप्रित्यर्थ तिच्या मुलांनी एक वडाचे किंवा पिंपळाचे झाड लावले, काही वर्षांनी ते झाड मोठे झाले. त्याच्या सावलीत एखादा वृद्ध विसावला, एखाद्या विद्यार्थ्याने पुस्तक वाचले, एखाद्या पक्ष्याने घरटे बांधले, एखाद्या वाटसरूने उन्हापासून स्वतःचा बचाव केला. त्या प्रत्येक क्षणी त्या 'आई'ची आठवण एका नव्या अर्थाने जिवंत राहील. वडिलांच्या स्मृतीत लावलेले झाड मुलाला आयुष्यभर सांगत राहील "तुमचे बाबा आज शरीराने नाहीत, पण त्यांनी दिलेली सावली अजूनही तुमच्यासोबत आहे." मग स्मृती जपण्याची यापेक्षा सुंदर पद्धत कोणती? अस्थी पाण्यात विलीन होतात, पण स्मृतींचे झाड मातीशी नाते जोडते, आकाशाकडे वाढते आणि पुढच्या पिढीला सावली देते.

नद्या केवळ पाण्याचे प्रवाह नाहीत. त्या आपल्या संस्कृतीच्या साक्षीदार आहेत. अनेक शहरांचे, गावांचे आणि मानवी जीवनाचे अस्तित्व नद्यांशी जोडलेले आहे. त्यामुळे नदीची स्वच्छता ही केवळ पर्यावरणाची नव्हे, तर आपल्या सामूहिक संस्कृतीची जबाबदारी आहे. अंत्यसंस्कारानंतर अस्थी विसर्जनासोबत अनेकदा फुले, हार, कापड आणि इतर साहित्यही नदीत जाते. प्रत्येक कुटुंबामुळे मोठे प्रदूषण होते असे सरसकट म्हणणे योग्य ठरणार नाही, परंतु मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या धार्मिक व सामाजिक विधींमध्ये नदीत जाणारे अतिरिक्त साहित्य जलप्रदूषणाचा प्रश्न वाढवू शकते. म्हणून प्रश्न श्रद्धेचा नाही, श्रद्धेच्या पर्यावरणपूरक अभिव्यक्तीचा आहे. नदीला प्रदूषित न करता श्रद्धा व्यक्त करता येते का? होय, नक्कीच.

परंपरा ही समाजाची सांस्कृतिक स्मृती असते. ती एका दिवसात बदलत नाही आणि बदल घडवून आणतांना कोणाच्याही श्रद्धेची खिल्ली उडवणे हा मार्ग असू शकत नाही. मात्र समाज बदलतो, विज्ञान पुढे जाते, पर्यावरणीय प्रश्न गंभीर होतात आणि त्यानुसार काही प्रथा नव्या स्वरूपात स्वीकारणे आवश्यक ठरते. कधीकाळी अनेक गोष्टी अपरिहार्य मानल्या जात होत्या. आज त्यांना पर्याय उपलब्ध झाले आहेत. तसेच अंत्यसंस्कारानंतरच्या स्मृती जपण्याच्या पद्धतीतही पर्यावरणपूरक पर्यायांचा विचार होऊ शकतो. "परंपरा जपा, पण पर्यावरणाची किंमत मोजून नव्हे" हा विचार समाजाने स्वीकारण्याची वेळ आली आहे.

एखाद्या व्यक्तीच्या स्मृतीत झाड लावण्याची कल्पना व्यापक झाली, तर त्याचे अनेक सकारात्मक परिणाम होऊ शकतात. प्रत्येक कुटुंबाने एका प्रिय व्यक्तीच्या स्मरणार्थ एक झाड लावले, त्याची जबाबदारी घेतली आणि ते जगवले, तर काही वर्षांत हजारो नव्हे तर लाखो झाडे उभी राहू शकतात. मात्र केवळ झाड लावणे पुरेसे नाही. झाड जगवणे हीच खरी श्रद्धांजली आहे. फोटो काढून वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपला, तर त्याचा अर्थ नाही. त्या रोपट्याला पाणी कोण देणार? संरक्षण कोण करणार? जनावरांपासून त्याचे रक्षण कसे होणार? त्याची वाढ कोण पाहणार? या प्रश्नांची उत्तरेही तितकीच महत्त्वाची आहेत. कारण मृत व्यक्तीच्या नावाने झाड लावणे ही भावना आहे, पण ते झाड मोठे करणे ही जबाबदारी आहे.

मृत्यू हा प्रत्येक कुटुंबासाठी वेदनादायी प्रसंग असतो. अशा वेळी तर्कापेक्षा भावना मोठी असते. त्यामुळे पर्यावरणपूरक पर्याय सांगताना संवेदनशीलता आवश्यक आहे. "हे चुकीचे, ते बरोबर" अशी भाषा न वापरता, "आपण आणखी सुंदर काय करू शकतो?" असा संवाद सुरू झाला पाहिजे. प्रिय व्यक्तीच्या स्मृतीने एक झाड लावणे म्हणजे मृत्यूच्या दुःखाला जीवनाच्या निर्मितीशी जोडणे होय. एक जीव गेला पण त्याच्या स्मृतीतून दुसऱ्या असंख्य जीवांना जगण्याची संधी मिळाली, तर त्या स्मृतीला अधिक व्यापक अर्थ प्राप्त होतो. पक्ष्याला घरटे मिळते, वाटसरूला सावली मिळते, हवेतील कार्बन शोषला जातो, मातीचे संरक्षण होते, परिसर हिरवा होतो आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रिय व्यक्तीची आठवण जिवंत राहते.

आज आपल्याला स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे, आपल्या प्रिय व्यक्तीला आपण खरोखर काय देऊ शकतो? नदीत काही क्षणांसाठी विसर्जित होणारी आठवण की वर्षानुवर्षे सावली देणारे झाड? याचे उत्तर प्रत्येक कुटुंबाने आपल्या श्रद्धा, परंपरा आणि परिस्थितीनुसार ठरवावे. मात्र पर्यावरणपूरक पर्यायांचा विचार करण्यास कोणतीही हरकत नसावी. अस्थी विसर्जन हा श्रद्धेचा विषय असू शकतो, पण झाड लावणे ही भावनेसोबत भविष्यातील पिढ्यांप्रती असलेली जबाबदारीही आहे. आज आपल्या नद्या स्वच्छ ठेवण्याची आणि उद्याच्या पिढीसाठी हिरवे जग निर्माण करण्याची गरज आहे. म्हणूनच मृत व्यक्तीच्या स्मृतीला नदीच्या प्रवाहात सोडण्यापेक्षा त्या स्मृतीला एका रोपट्याच्या रूपाने मातीशी जोडण्याचा विचार समाजाने केला पाहिजे. कारण माणूस जातो, आठवणी राहतात आणि त्या आठवणींना जर झाडाचे रूप दिले, तर त्या केवळ मनात नाही तर निसर्गातही श्वास घेत राहतात.

अस्थी विसर्जनापेक्षा स्मृतींचे वृक्षारोपण हा परंपरेचा अपमान नाही, तर दुःखाला जीवन देण्याचा आणि श्रद्धेला पर्यावरणाशी जोडण्याचा नवा विचार आहे. प्रिय व्यक्तीच्या स्मृतीसाठी एक झाड लावा ते जगवा आणि त्या झाडाच्या प्रत्येक पानात आपल्या माणसाची आठवण पुन्हा पुन्हा अनुभवत राहा. "मी माझ्या आईच्या स्मृतीत एक झाड लावले आहे, आपणही आपल्या प्रिय व्यक्तीच्या स्मृतीत एक झाड लावा. कारण आठवणी केवळ मनात जपण्यापेक्षा त्या निसर्गात रुजवल्या, तर त्या पिढ्यान्‌पिढ्या सावली देत राहतात."

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : 9923620919

FDA ने CIPLA फार्माला दिला दणका, गोदामातील औषध विक्री परवानेच केले रद्द

पुणे: अन्न- औषध प्रशासनाने औषधांची सुरक्षितता, गुणवत्ता, योग्य साठवणूक तसेच औषध विक्री आणि वितरणातील वैधानिक अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने कारवाई केली जात आहे. सिप्ला फार्मा अँड लाईफ सायन्सेस लि. कंपनीच्या पुण्यातील वडकीतील गोदामाच्या औषध विक्री परवान्याच्या संदर्भातील प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या Writ Petition No. 11376/2026 मधील निर्देशांच्या अनुषंगाने विभागाने आवश्यक ती पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून पूर्वीची कार्यवाही मागे घेण्यात आली आहे. 4 सप्टेंबर 2026 रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. संस्थेने 11 सप्टेंबर 2026 रोजी लेखी उत्तर सादर केले. 21 सप्टेंबर 2026 रोजी वैयक्तिक सुनावणीची संधी देण्यात आली. संस्थेचे लेखी उत्तर, सुनावणीतील म्हणणे, तपासणीतील निष्कर्ष, उपलब्ध अभिलेख आणि लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींचा एकत्रित विचार करून संस्थेचे वडकी, पुणे येथील सी. एफ. ए. घाऊक औषध विक्री परवाने रद्द आदेश सहाय्यक आयुक्त (औषधे), परिमंडळ- 3 तथा परवाना प्राधिकारी, अन्न- औषध प्रशासन, पुणे यांनी 1 ऑक्टोबर 2026 रोजी पारित केला आहे.

यामुळे सदर निर्णय हा केवळ पूर्वीच्या कारवाईची पुनरावृत्ती नसून, न्यायालयीन निर्देशांनुसार नव्याने संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून घेतलेला स्वतंत्र नियामक निर्णय आहे. कंपनीला सुनावणीची संधी देण्यात आली. लेखी उत्तर, सुनावणीतील मांडणी, तपासणीतील निष्कर्ष, उपलब्ध अभिलेख आणि लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींचा एकत्रित विचार करून सकारण आदेश पारित करण्यात आला. कंपनीविरोधात, रिॲक्शन प्लस औषधासंदर्भात मिसब्रँडिंगची तक्रार दाखल करण्यात आली आहे. पुण्यातील वडकी येथील गोदामाच्या तपासणीदरम्यान Reactin Plus (Schedule H) औषधाचा साठा आढळून आला. त्या औषधावर डोकेदुखी, सांधेदुखी, स्नायुदुखी, पाठ दुखी, दात दुखी यांसह वेगवेगळ्या वेदनांपासून त्वरित आराम मिळेल, अशी जाहिरात करण्यात आली होती.

औषधाच्या बॉटलीवर मानवी आकृती दाखवून ह्या औषधाच्या वापराने स्नायू मधील दुखणे कमी होते असे दर्शवण्यात आले होते. औषधाच्या बॉक्सवर असलेले दावे, मजकूर आणि चित्रण याबाबत लागू असलेल्या वैधानिक तरतुदींचे अनुपालन न झाल्याचे निदर्शनास आले. या बाबीच्या अनुषंगाने औषध-सौंदर्य प्रसाधने अधिनियम, 1940 अंतर्गत मिसब्रँडिंगचा मुद्दा निर्माण झाला होता आणि त्याबाबत आवश्यक नियामक कार्यवाही करण्यात आली. औषधे सौंदर्य प्रसाधने नियमानुसार औषध बाजारात आणणाऱ्या कंपनीची जबाबदारी विचारात घेण्यात आली. केवळ उत्पादकाची जबाबदारी दाखवून कंपनी म्हणून असलेल्या वैधानिक जबाबदारीपासून संबंधित आस्थापना मुक्त होऊ शकत नाही, असा निष्कर्ष परवाना प्राधिकरणाने नोंदविला आहे. तपासणीदरम्यान अन्न-औषध प्रशासनाच्या अनेक बाबी निदर्शनास आल्या.

कोणत्या कारणामुळे परवना रद्द केला?

नियमानुसार आवश्यक फॉर्म 35 तपासणी पुस्तक उपलब्ध नसणे. औषधांचे बॉक्स पुरेशा पॅलेट्स/ रॅक्सअभावी थेट जमिनीवर ठेवलेले असणे. औषधांच्या साठ्यावर धूळ साचलेली आणि स्वच्छतेच्या बाबतीत त्रुटी आढळणे. मुदतबाह्य औषधांसाठी स्वतंत्र क्षेत्रात Expiry-Not for Sale असा स्पष्ट फलक नसणे. मुदतबाह्य औषधांच्या विल्हेवाटीसंदर्भात आवश्यक SOP आणि अभिलेख उपलब्ध नसणे. खरेदीच्या पावत्यांमध्ये अनुक्रमांकाचा अभाव. विक्री पावत्यांच्या दुय्यम प्रतींमध्ये दुकानदाराच्या सहीमध्ये घोळ. संगणकीय/ SAP नोंदी आणि प्रत्यक्ष उपलब्ध औषधसाठ्यामध्ये तफावत आढळणे, ज्यामध्ये प्रतिजैविक औषधांचाही समावेश होता.

आस्थापनेने आपल्या लेखी उत्तरात तसेच वैयक्तिक सुनावणीदरम्यान विविध स्पष्टीकरणे सादर केली. परवाना प्राधिकरणाने संबंधित सर्व मुद्द्यांचा स्वतंत्रपणे विचार केला. तथापि, केवळ SAP किंवा अन्य संगणकीय प्रणालीमध्ये नोंदी ठेवण्यात आल्या आहेत, या कारणामुळे वैधानिक अभिलेख, प्रत्यक्ष साठा, औषधांची सुरक्षित, योग्य साठवणूक, स्वच्छता आणि तपासणीसाठी आवश्यक कागदपत्रे यावावतच्या जबाबदाऱ्यांमधून सूट मिळत नाही, असा निष्कर्ष आदेशात नोंदवण्यात आला आहे.

औषधांच्या विक्री- वितरण साखळीत काम करणाऱ्या प्रत्येक परवानाधारक आस्थापनेवर कायद्याने निश्चित केलेल्या जबाबदाऱ्यांचे प्रत्यक्ष पालन करणे आवश्यक आहे. "अन्न- औषध प्रशासनाचे उद्दिष्ट केवळ कारवाई करणे नसून, औषधांची सुरक्षितता, गुणवत्ता आणि औषध पुरवठा साखळीतील वैधानिक अनुपालन सुनिश्चित करणे हे आहे. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांचा पूर्ण आदर राखून नैसर्गिक न्यायतत्त्वे, पारदर्शकता, सुनावणीची संधी आणि कारणयुक्त निर्णय या सर्व बाबींचे पालन करून कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.", अशी प्रतिक्रिया अन्न- औषध प्रशासनाने दिली आहे.

वाढदिवसानिमित्त बुलडाणा अर्बनकडून मोफत आरोग्य तपासणी शिबिर



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.२ ऑक्टोबर

बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.चे संस्थापक अध्यक्ष तथा तज्ज्ञ संचालक राधेश्यामजी देविकसनजी चांडक यांच्या वाढदिवसानिमित्त बुलडाणा अर्बन आणि संजीवनी हॉस्पिटल सिल्लोड यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .

या शिबिरात नागरिकांसाठी ईसीजी, रक्तातील साखर, रक्तदाब तपासणी तसेच मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. नेत्र तपासणीसाठी डॉ. राहुल कुलकर्णी डॉक्टर शेखर रोकडे सर सायली पाटील (नेत्ररोग तज्ज्ञ) यांच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने तपासणी करण्यात आल्या .

आरोग्य तपासणीच्या माध्यमातून नागरिकांना प्राथमिक आरोग्यविषयक मार्गदर्शन व आवश्यक तपासण्या व मोफत मेडिसिन बुलढाणा अर्बन तर्फे उपलब्ध करून देण्यात आल्या. वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेचा उपक्रम राबविण्यात आल्याने शिबिराला उपस्थितांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. हे आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात साजरे केले . यावेळी . बुलढाणा अर्बन चे शाखा संचालक प्रदीप ठाकरे सचिन ठाकरे डॉक्टर मेहेर माधव सोमवंशी रणजीत खेडकर मानसिंग राजपूत विभागीय व्यवस्थापक संजय दळवी विभागातील सर्व शाखा व्यवस्थापक कर्मचारी वर्ग व सर्व डॉक्टर टीमचे सहकारी यांनी आपले अमूल्य योगदान देऊन कार्यक्रम यशस्वी केला यावेळी असंख्य सभासदांनी तपासणी करून संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

सोलफेज स्मार्ट इलेक्ट्रॉनिक्सचा आयपीओ खुला; ₹21.78 कोटी उभारणार

कोलकाता,: स्मार्ट इलेक्ट्रॉनिक्स आणि प्रीमियम होम एंटरटेनमेंट क्षेत्रातील सोलफेज स्मार्ट इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड आपला इनिशियल पब्लिक ऑफरिंग म्हणजेच आयपीओघेऊन येत आहे. कंपनीचा आयपीओ 30 सप्टेंबर 2026 रोजी सब्स्क्रिप्शनसाठी खुला होणार असून 5 ऑक्टोबर 2026 रोजी बंद होईल. या आयपीओ च्या माध्यमातून कंपनी ₹21.78 कोटी उभारण्याच्या तयारीत आहेप्रीमियम होम एंटरटेनमेंट क्षेत्रात विस्तार सोलफेज स्मार्ट इलेक्ट्रॉनिक्स ही कंपनी होम थिएटर, हाय-एंड ऑडिओ, प्रोजेक्टर आणि स्मार्ट होम ऑटोमेशन यांसारख्या उत्पादनांमध्ये कार्यरत आहे. एक्सपिरिएंस सेंटर मॉडेलच्या माध्यमातून ग्राहकांना प्रीमियम ऑडिओ-व्हिडिओ आणि स्मार्ट होम सोल्यूशन्स उपलब्ध करून देण्यावर कंपनीचा भर आहे. कंपनीच्या मते, स्मार्ट आणि कनेक्टेड घरांची वाढती मागणी तसेच प्रीमियम होम एंटरटेनमेंट सोल्यूशन्समधील वाढता कल यामुळे या क्षेत्रात विस्ताराच्या संधी निर्माण होत आहेत. आयपीओनंतर 12 नवीन शोरूम्स च्या माध्यमातून कंपनी आपले रिटेल नेटवर्क वाढवण्याचे लक्ष्य ठेवत आहे.

'प्रोग्रेस दॅट पॉवर्स एव्हरीवन'च्या माध्यमातून प्रगतीचे दर्शन

बेंगळुरू : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज आपला 'सस्टेनेबिलिटी रिपोर्ट 2026' सादर केला. 'प्रोग्रेस दॅट पॉवर्स एव्हरीवन' या संकल्पनेवर आधारित हा अहवाल टोयोटाच्या तत्त्वज्ञान, मूल्ये आणि 'प्रोड्युसिंग हॅपिनेस फॉर ऑल' या ध्येयावर आधारित आहेया अहवालाच्या सादरीकरणावर भाष्य करताना, टोयोटा किर्लोस्कर मोटरचे वरिष्ठ कार्यकारी उपाध्यक्ष, मॅन्युफॅक्चरिंग,श्री.बी.पद्मनाभा म्हणाले, "टोयोटामध्ये शाश्वतता ही समाजासाठी मूल्य निर्माण करण्याच्या आमच्या कार्यपद्धतीचा अविभाज्य भाग आहे. टोयोटा वे आणि 'प्रोड्युसिंग / स्प्रेडिंग हॅपिनेस फॉर ऑल' या आमच्या वचनबद्धतेने प्रेरित होऊन, आम्ही शाश्वत व्यावसायिक वाढीसोबत पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक प्रगती यांचा समतोल साधत आहोत.

'भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र'ला केंद्र सरकारकडून मंजुरी मिळाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पोस्ट

मुंबई: मराठी भाषिकांसाठी अभिमानास्पद बातमी आहे. अभिजात मराठी भाषा सन्मान दिवसाच्या पुर्वसंध्येला केंद्र सरकारने पुण्यामध्ये 'अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र' उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाला काही तासांपूर्वीच केंद्र सरकारने मंजुरी देण्यात आली आहे. 'अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र'ला केंद्र सरकारकडून घोषणा करण्यात आल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहे. नेमकं मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोस्टमध्ये काय लिहिलंय, जाणून घेऊया...

सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये मुख्यमंत्र्यांनी लिहिलंय की, "लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी... मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्यानंतर 'अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र' (Centre of Excellence for Studies in Classical Marathi) स्थापन करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरु होता. मला हे सांगताना अतिशय आनंद होतो की, केंद्र सरकारने ही मागणी मान्य केली असून, पुण्यातील डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था येथे 'अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र' स्थापन करण्यास मंजुरी प्राप्त झाली आहे. याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम राज्य सरकारने आधीच हाती घेतले होते. तो केंद्राकडे सादर करुन आवश्यक निधी प्राप्त करण्याचा मार्गही यामुळे मोकळा होणार आहे. 'अभिजात मराठी भाषा दिना'च्या पूर्वसंध्येला हा निर्णय झाल्याबद्दल महाराष्ट्रातील आम्हा सर्व नागरिकांना अत्यानंद होतो आहे. महाराष्ट्र, देश आणि जगभरातील मराठीजनांसाठी ही बातमी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची आहे. या निर्णयाबद्दल मी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे मनापासून आभार मानतो." पोस्टच्या शेवटी #मराठी असं लिहिलं आहे.

दरम्यान, भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने 4 ऑक्टोबर 2024 रोजी मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' (Classical Language) दर्जा बहाल केला होता. या ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निर्णयाचाच पुढील टप्पा म्हणून आता पुण्यात या उत्कृष्ट केंद्राची स्थापना केली जात आहे. या महत्त्वाच्या केंद्राच्या उभारणीमुळे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, संशोधनासाठी आणि विविध विकास प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडून मोठा निधी उपलब्ध होणार आहे. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने, मराठीसह आसामी, बंगाली, पाली आणि प्राक्रित या भाषांसाठीही 'भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र' उभारण्यासाठी मंजुरी दिली आहे.

महात्मा गांधी जयंतीनिमित्त वनामकृविच्या सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या 90 विद्यार्थ्यांचे स्वच्छता अभियानात उत्स्फूर्त श्रमदान

'स्वच्छता ही केवळ मजुरांची जबाबदारी नसून प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी' : कुलगुरू प्रा. डॉ. इन्द्र मणि

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



परभणी :-राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त तसेच 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या सामुदायिक विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) च्या वतीने दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी महाविद्यालय आणि विद्यापीठातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. हे अभियान माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या निर्देशानुसार आणि शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. या अभियानात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि सुमारे ९० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदान केले.

यावेळी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे तसेच वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे यांनी सामुदायिक विज्ञान महाविद्यालयांमध्ये सुरू असलेल्या स्वच्छता अभियानाची पाहणी केली.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि म्हणाले की, महात्मा गांधी यांनी स्वच्छतेला केवळ सामाजिक उपक्रम न मानता ती जीवनपद्धती म्हणून स्वीकारण्याचा संदेश दिला आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरासोबतच आपले कार्यालय आणि मनही स्वच्छ ठेवले पाहिजे. अस्वच्छतेमुळे विविध आजारांना आमंत्रण मिळते आणि रोगराई कोणतेही पद किंवा व्यक्ती पाहून येत नाही. त्यामुळे स्वच्छतेला प्रत्येकाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे. स्वच्छता ही केवळ स्वच्छता कर्मचाऱ्यांची किंवा मजुरांची जबाबदारी आहे, अशी भावना न ठेवता प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्याने स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. आजच्या दिवसापुरते मर्यादित न राहता स्वच्छतेचे कार्य सातत्याने सुरू ठेवून आपले महाविद्यालय तसेच संपूर्ण विद्यापीठ परिसर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले.

सामुदायिक विज्ञान महाविद्यालयात विशेष स्वच्छता अभियान

सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयात महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अधिष्ठाता डॉ. नीता गायकवाड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

तद्नंतर अधिष्ठाता डॉ. नीता गायकवाड आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. शंकर पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयालगतच्या तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया समोरील परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

विद्यार्थ्यांनी परिसरातील प्लास्टिक कचरा, खाद्यपदार्थांच्या पाकिटांचे रॅपर्स, विविध प्रकारचा कचरा तसेच गाजर गवत यांचे निर्मूलन करून परिसर स्वच्छ केला. संकलित केलेला कचरा योग्य पद्धतीने एकत्रित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी 'स्वच्छता ही सेवा', स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचे संदेश देणाऱ्या घोषणा देत परिसरात स्वच्छतेविषयी जनजागृती केली.

या स्वच्छता अभियानातून विद्यार्थ्यांनी श्रमप्रतिष्ठा, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश दिला. गांधी जयंतीनिमित्त राबविण्यात आलेल्या या अभियानामुळे विद्यापीठ परिसरात स्वच्छतेबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

गांधी जयंतीनिमित्त भास्कर आबा दानवेंचा ई-बसने प्रवास



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

जालना : पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषणमुक्त वाहतुकीचा संदेश देण्यासाठी भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी महात्मा गांधी जयंतीनिमित्त गुरुवारी जालना ते छत्रपती संभाजीनगर असा ई-बसने प्रवास केला. यावेळी त्यांनी बसच्या चालकासह प्रवाशांशी संवाद साधून ई-बसच्या सुविधांची तसेच प्रवाशांच्या अडचणींची माहिती जाणून घेतली.

प्रवासादरम्यान दानवे यांनी ई-बस चालविण्याचा अनुभव, बसमधील तंत्रज्ञान, चार्जिंग व्यवस्था आणि प्रवाशांचा मिळणारा प्रतिसाद याबाबत चालकाकडून माहिती घेतली. तसेच बसमधील प्रवाशांशी संवाद साधत त्यांच्या प्रवासाचा अनुभव आणि अडचणी जाणून घेतल्या. पर्यावरण संवर्धनाची सुरुवात स्वतःपासून करण्याचा संदेश देत दानवे यांनी दर महिन्याला किमान एकदा सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करण्याचा संकल्प यावेळी जाहीर केला.

यावेळी दानवे म्हणाले, "ई-बसचा वाढता वापर हे स्वच्छ आणि हरित भविष्यासाठी टाकलेले सकारात्मक पाऊल आहे. ई-बसच्या वापरामुळे इंधनाची बचत होण्यासोबतच प्रदूषण कमी करण्यास मदत होते. पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे."नागरिकांनीही दैनंदिन प्रवासात शक्य तितक्या पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन

स्वर्गीय सरलादेवी बगडिया बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेकडून घेण्यात आले विविध उपक्रम



हिंगोली : स्वर्गीय सरलादेवी बगडिया बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, हिंगोली यांच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त तापडिया इस्टेट या ठिकाणी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या राष्ट्रसेवा, सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि साधेपणाच्या विचारांना अभिवादन करण्यात आले. समाजामध्ये बंधुभाव, स्वच्छता, सामाजिक बांधिलकी आणि देशप्रेमाची भावना रुजविण्यासाठी महापुरुषांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष नवनीत बगडिया, सचिव कशिश बगडिया, तसेच विक्रम कंठाळे, श्रीमती गंगाबाई बगडिया, सपना बगडिया यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत समाजहितासाठी विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

अजय रोडिया यांची शेरी स्मशानभूमी ट्रस्टच्या सचिवपदी निवड



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

जालना : शेरी स्मशानभूमी ट्रस्ट, जालना यांच्या सचिवपदी अजय रोडिया यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी रोडिया यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी महाराष्ट्र राज्य पंचायत राज समितीचे अध्यक्ष आमदार संतोष पाटील दानवे, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, परमपूज्य श्री. चंदन महाराज मिश्रा, भाजपा जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सतीश केरकळ, भाजपा पूर्व मंडळ अध्यक्ष सुनील खरे, देविदास देशमुख, राजेश जोशी, राहुल यादव आदी उपस्थित होते.

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात पोषण, बालविवाह व स्वच्छतेबाबत मार्गदर्शन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



परभणी: 'सेवा संकल्प अभियान', आयसीडीएस डे, पोषण माहच्या निमित्ताने पाथरी येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय येथे आज विविध जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विद्यालयातील सुमारे २५० किशोरवयीन मुलींनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

यावेळी किशोरवयीन मुलींचा संतुलित आहार, पोषण, बालविवाह प्रतिबंध आणि वैयक्तिक स्वच्छता या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

किशोरवयात शरीराची वाढ व विकास योग्य पद्धतीने होण्यासाठी सकस व पौष्टिक आहाराचे महत्त्व विद्यार्थिनींना समजावून सांगण्यात आले.

नंदाताई गायकवाड, एनजीओ, पाथरी यांनी बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच बालविवाह रोखण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

पर्यवेक्षिका धनासुरे मॅडम यांनी वैयक्तिक स्वच्छता, परिसर स्वच्छता आणि आरोग्यदायी सवयींचे महत्त्व विद्यार्थिनींना पटवून दिले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये पोषण, आरोग्य, स्वच्छता आणि बालविवाह प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत आयोजित या उपक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त अभिवादन



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. या निमित्त मुख्य प्रशासकीय इमारतीत अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी प्रकुलगुरू डॉ.प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ.संजय कवडे, वित्त व लेखाधिकारी सविता जंपावाड, परीक्षा मंडळ संचालक डॉ. बी एन डोळे, अधिष्ठाता डॉ.सय्यद अझरुद्दीन, डॉ.भास्कर साठे, संचालक डॉ.सुभाष चव्हाण, डॉ.कैलास अंभुरे, डॉ.अश्विन रांजणीकर, डॉ सोमनाथ खाडे, डॉ सुधाकर शेंडगे, डॉ.संजय शिंदे, उपकुलसचिव माधव वागतकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

एमजीएममध्ये विविध उपक्रमांनी गांधी जयंती साजरी; रक्तदान शिबिरासह 'अहिंसा परमो धर्म' प्रदर्शन; विद्यार्थ्यांचा 'भजन प्रभात' कार्यक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी यांच्या १५७व्या जयंतीनिमित्त महात्मा गांधी मिशन विद्यापीठात विविध उपक्रमांचे आयोजन करून गांधी जयंती साजरी करण्यात आली. रुक्मिणी सभागृहात महात्मा गांधी आणि भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना सुतमाला अर्पण करून पुष्पांजली वाहण्यात आली. यावेळी रक्तदान शिबिर तसेच 'अहिंसा परमो धर्म' या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, डॉ. रेखा शेळके, डॉ. प्राप्ती देशमुख यांच्यासह संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे 'भजन प्रभात' कार्यक्रम झाला. विभागप्रमुख डॉ. राजू सोनवणे व डॉ. मेधा लखपती यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी 'सर्वधर्म समभाव प्रार्थना', 'राम रतन धन पायो', 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'गगन सदन', 'ऐ मालिक तेरे बंदे हम', 'रघुपती राघव राजाराम' आदी गीते सादर केली. डॉ. राजू सोनवणे यांनी 'गोपाल गोपाला देवकी नंदन' हे गीत सादर केले.

डॉ. पी. एम. जाधव म्हणाले, महात्मा गांधींच्या अहिंसेच्या विचारांसह लालबहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान, जय किसान' या संदेशातून प्रेरणा घेऊन त्यांचे विचार जीवनात आचरणात आणले पाहिजेत. कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी गांधीजींचे विचार कृतीत आणण्याची गरज व्यक्त केली. निसर्गाच्या जवळ राहण्याचा गांधीजींचा विचार तसेच शास्त्रीजींची साधी जीवनशैली आणि कृषी विकासासाठीचे योगदान आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२ ऑक्टोबर

आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र व इतिहास विभागाच्या वतीने पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयामध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी कै.बाबुरावजी काळे महाविद्यालय अजिंठा येथील प्रोफेसर डॉ.कैलास गाडेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमास समन्वयक प्रोफेसर डॉ.भास्कर टेकाळे,प्रा.डॉ.ज्योती आधने,प्रोफेसर डॉ.विक्रम भुतेकर,प्रो. लक्ष्मीनारायण कुरपतवॉर,प्रा.वंदना कदम,प्रा.रामहरी सोंडगे,प्रा.गोविंद फड,प्रा.निखिल भिसे,यांच्या सह महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वनामकृवि आणि ग्लोबार्क सोल्युशन्स लिमिटेडमध्ये कार्बन क्रेडिटसाठी सामंजस्य करार

शाश्वत शेती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जमिनीतील कर्बाचे संवर्धन व शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिटचा लाभ देण्याचा प्रयत्न

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



परभणी :-वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि ग्लोबार्क सोल्युशन्स लिमिटेड यांच्यामध्ये कार्बन क्रेडिट निर्मितीसाठी आवश्यक तंत्रज्ञानाची अंमलबजावणी व शाश्वत शेती पद्धतींना प्रोत्साहन देण्याबाबत दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला.

हा सामंजस्य करार माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार असून, या उपक्रमाच्या माध्यमातून शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब, जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे संवर्धन तसेच शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिटच्या माध्यमातून आर्थिक लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणार आहेत.

या सामंजस्य करारावर वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या वतीने संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार आणि ग्लोबार्क सोल्युशन्स लिमिटेडच्या वतीने श्री. वत्सल अग्रवाल यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी संचालक शिक्षण डॉ. बाबासाहेब ठोंबरे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, परभणी कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे, एकात्मिक शेती पद्धतीचे प्रभारी अधिकारी तथा विभाग प्रमुख प्रा. (डॉ.) के. टी. जाधव, मृदाशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हरिहर कोसडीकर, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख, उपसंचालक संशोधन डॉ. रणजीत चव्हाण, कापूस विशेषज्ञ डॉ. चिंचाणे, प्रभारी अधिकारी डॉ. मेघा जगताप, शास्त्रज्ञ डॉ. अरविंद पांडागळे आणि डॉ. कैलास डाखोरे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, शास्त्रज्ञ व इतर मान्यवर उपस्थित होते.

जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे घटते प्रमाण ही शेतीसमोरील महत्त्वाची समस्या असून, त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी शेती व्यवस्थापनाच्या विविध पद्धतींमध्ये आवश्यक बदल करणे गरजेचे आहे. या उपक्रमांतर्गत मशागतीच्या पद्धतींमध्ये आवश्यक बदल, आधुनिक सिंचन पद्धतींचा वापर, पिकांच्या अवशेषांचे आच्छादन, डाळवर्गीय पिकांचे आंतरपीक तसेच कर्ब संवर्धनासाठी बायोचारसारख्या तंत्रज्ञानाचा वापर यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

शाश्वत शेती तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक शेती पद्धतींच्या अवलंबातून शेतजमिनीतील कर्बाचे संवर्धन करण्यास तसेच मृदा आरोग्य सुधारण्यास मदत होणार आहे. निर्धारित निकषांनुसार कार्बन क्रेडिट निर्मिती, त्याचे प्रमाणीकरण आणि त्याचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या प्रक्रियेत ग्लोबार्क सोल्युशन्स लिमिटेड कार्य करणार आहे. यासाठी आवश्यक कृषि तंत्रज्ञान, संशोधनाधारित मार्गदर्शन आणि तांत्रिक सहकार्य वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

यामिनी कोळीची ज्युदो स्पर्धेत जिल्हास्तरावर बाजी ;विभागीय स्तरासाठी निवड

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी



सोयगाव, दि. २ ऑक्टोबर

बजाजनगर व्यायाम क्रीडा प्रसारक मंडळाच्या ज्युदो प्रशिक्षण केंद्रात झालेल्या ज्युदो स्पर्धेत संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील अकरावी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी यामिनी चंद्रकांत कोळी हिने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळविला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यामिनीच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे तसेच कनिष्ठ विभागप्रमुख डॉ. उल्हास पाटील यांनी तिचे अभिनंदन केले. यामिनीला डॉ. निलेश गाडेकर व प्रा. शेख तौफिक यांनी मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षकवृंद डॉ. एस.एल. पाटील, प्रा.रवींद्र जाधव,प्रा.दीपक लिंबे,प्रा. शंकर कानडे, प्रा. विनोद चव्हाण, प्रा. स्वाती देशमुख, प्रा. बी.ए. पाटील, प्रा. अनिल मानकर, प्रा. बुटुले, प्रा. योगेश काळे, प्रा. अश्विनी काळे, प्रा. दीपक तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यामिनीचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

बनावट लग्न लावणाऱ्या मुबंई च्या टोळीला पकडले

राहुरी : नवरदेवाकडून चार लाख रुपये रोख रक्कम घेऊन मुंबई येथील तरुणीचे राहुरी येथील तरुणाशी लग्न लावून देण्यात आले. एक महिन्या नंतर नवरी मुलगी व फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला. नवरी मुलगी व तीच्या साथीदारांना पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

राहुरी तालुक्यातील चिंचोली फाटा येथील एका तरुणाला लग्न करायचे असल्याने तो नवरी मुलीच्या शोधात होता. दरम्यान मुंबई येथील एका एजंट महिलेने त्याला मुंबई येथील तरुणी दाखवली. त्या बदल्यात तीने नवरदेव तरुणाकडून चार लाख रुपए रोख रक्कम घेतली. सुमारे एक महिन्यापूर्वी दोघांचे लग्न लावून देण्यात आले. नवरी मुलगी महिनाभर कशीतरी नवरदेव तरुणाच्या घरी राहिली. दरम्यान सदर नवरी मुलीचे अगोदरच लग्न झालेले असून तीला चार मुले आहेत. तसेच तीला दारु व गुटखा खाण्याचे व्यसन असल्याचे उघडकीस आले. आपली फसवणूक करून चार लाख रुपए लूटल्याचे लक्षात आल्यानंतर नवरदेवावर तोंड झोडून घेण्याची वेळ आली. माझा व माझ्या चार मुलांचा संभाळ करा. अशी नवरी मुलीची मागणी आहे. दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी नवरदेव मुलगा व त्याच्या नातेवाईकांनी सदर नवरी मुलगी व तीच्या साथीदारांना पकडुन पोलिसांच्या ताब्यात दिले.

मांडवा येथे 'स्वच्छता ही सेवा' अभियानातून श्रमदान; कचरा विलगीकरणाबाबत जनजागृती



हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी : 'स्वच्छता ही सेवा' व 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत जिंतूर तालुक्यातील मांडवा ग्रामपंचायत परिसरात आज श्रमदान मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ग्रामस्थ, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडीताई, आशा कार्यकर्त्या, बचतगटातील महिला तसेच गावकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी ग्रामपंचायत मांडवा येथे भेट कचऱ्याचे चार प्रकारांमध्ये विलगीकरण करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. यासंदर्भातील माहितीपर पोस्टर्स शाळा व अंगणवाडीमध्ये वितरित करण्यात आले. तसेच ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि गाव स्वच्छ ठेवणे याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमाला परमेश्वर हलगे, ग्रामपंचायत अधिकारी श्री. घोडके, रिलायन्स फाउंडेशनच्या जिल्हा समन्वयक रूपा भांदक्कर, आकाश खुळे, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी ताई, आशा ताई, बचतगटातील महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

महात्मा गांधी जयंतीनिमित्त वनामकृवित 'सेवा संकल्प अभियान अंतर्गत स्वच्छता अभियान'; 1200 विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त श्रमदान

स्वच्छता ही दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनली पाहिजे : कुलगुरु प्रा. डॉ. इन्द्र मणि

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



परभणी :-महात्मा गांधी जयंतीनिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी मुख्यालायासह कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये आणि संशोधन केंद्रात 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विद्यापीठ शुक्रवार, दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या निर्देशानुसार या अभियानाचे आयोजन करण्यात आले.

शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या कृषी महाविद्यालय, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, अन्नतंत्र महाविद्यालय तसेच कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय या पाचही महाविद्यालयांतील अधिष्ठाता, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि एकूण १२०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यामध्ये ६५० विद्यार्थी आणि ५५० विद्यार्थिनींचा समावेश होता.

या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी सकाळी सुमारे दोन तास उत्स्फूर्तपणे श्रमदान करून महाविद्यालयीन परिसर, अंतर्गत रस्ते तसेच परिसरातील विविध ठिकाणी स्वच्छता केली. प्रत्यक्ष श्रमदानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वच्छता, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश दिला.

एकूण १२०० विद्यार्थ्यांनी प्रत्येकी दोन तास श्रमदान केल्यामुळे २,४०० मनुष्य-तासांचे श्रमदान झाले. सहा तासांचा एक मनुष्य-दिवस गृहीत धरल्यास हे सुमारे ४०० मनुष्य-दिवसांच्या श्रमदानाइतके आहे.

यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्लास्टिक कचरा, खाद्यपदार्थांच्या पाकिटांचे रॅपर्स तसेच गाजर गवताचे निर्मूलन करून महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर स्वच्छ व कचरामुक्त करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या घोषणा देत संपूर्ण परिसर दणाणून सोडला.

माननीय कुलगुरूंकडून स्वच्छता अभियानाची पाहणी

महात्मा गांधी जयंतीनिमित्त विद्यापीठ परिसरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेदरम्यान वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि, संचालक शिक्षण डॉ. बाबासाहेब ठोंबरे तसेच वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे यांनी परभणी मुख्यालयातील विद्यापीठाच्या सर्व महाविद्यालयांना सकाळी भेट देऊन स्वच्छता अभियानाची पाहणी केली. यावेळी त्यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे केलेल्या श्रमदानाचे कौतुक केले.

या भेटीदरम्यान माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनली पाहिजे, असे प्रतिपादन केले. महाविद्यालयीन परिसर स्वच्छ, सुंदर, निरोगी आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी सर्वांनी सामूहिक जबाबदारीने सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश आपल्या कुटुंबापर्यंत आणि समाजापर्यंत पोहोचवून स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले.

स्वच्छ परिसरामुळे सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्माण होते आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, शिस्त व जबाबदारीची भावना विकसित होते. त्यामुळे विद्यापीठातील प्रत्येक महाविद्यालयाने नियमित स्वच्छता उपक्रम, परिसर सुशोभीकरण, कचरा वर्गीकरण आणि पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांना सातत्य द्यावे, असे मार्गदर्शन करून माननीय कुलगुरूंनी सर्वांना प्रोत्साहित केले.

यावेळी शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी आपला परिसर नियमितपणे स्वच्छ व नीटनेटका ठेवावा, स्वच्छतेची सवय दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावी तसेच स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न वातावरण निर्मितीसाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

महात्मा गांधी जयंतीनिमित्त केवळ महाविद्यालयीन परिसर

महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी: जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी व माजी

पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नायब तहसीलदार प्रशांत वाकोडकर, सहायक महसूल अधिकारी दत्ता गिणगिणे, अर्चना देशमुख यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

४० ठिकाणी महास्वच्छता; ८५० सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

गांधी जयंतीनिमित्त महापौर-आयुक्तांसह लोकप्रतिनिधी, अधिकारी, विद्यार्थी आणि नागरिकांचा सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी जयंती आणि 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानाचे औचित्य साधून महानगरपालिकेच्या वतीने शहरातील ४० प्रमुख ठिकाणी एकाचवेळी महास्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ऐतिहासिक स्थळे, बाजारपेठा, मुख्य रस्ते, चौक आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ करण्यात आला. या मोहिमेत महापौर समीर राजूरकर, आयुक्त अमोल येडगे यांच्यासह लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, सफाई कर्मचारी, विद्यार्थी, स्वयंसेवक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. दरम्यान, एन-१२ कचरा हस्तांतरण केंद्र येथे आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात ८५० पेक्षा अधिक सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

महास्वच्छता मोहिमेसाठी महानगरपालिकेने शहरातील ४० प्रमुख ठिकाणांची निवड करून प्रत्येक ठिकाणाची जबाबदारी संबंधित विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांकडे सोपविली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सफाई कर्मचारी, अधिकारी, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवक आणि नागरिकांनी एकत्रितपणे स्वच्छता केली. रस्ते, चौक आणि सार्वजनिक परिसरातील कचरा, प्लास्टिक व इतर अनावश्यक साहित्य संकलित करण्यात आले.

बीबी का मकबरा परिसरात महापौर-आयुक्तांची स्वच्छता

शहराचे ऐतिहासिक वैभव असलेल्या बीबी का मकबरा परिसरात महापौर समीर राजूरकर, आयुक्त अमोल येडगे, उपायुक्त नंदकिशोर भोंबे आणि कार्यकारी अभियंता बाळासाहेब शिरसाठ यांनी प्रत्यक्ष स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. सभापती अनिल मकरिये यांनी निराला बाजार परिसरात, तर सभागृह नेते गोविंद केंद्रे यांनी गजानन मंदिर परिसरात स्वच्छता केली. उपमहापौर राजेंद्र जंजाळ, विविध विभागांचे सभापती आणि नगरसेवकांनीही आपापल्या प्रभागातील मोहिमेत सहभाग घेतला.

स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्यालाही प्राधान्य

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी दररोज प्रत्यक्ष काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी एन-१२ कचरा हस्तांतरण केंद्र येथे विशेष शिबिर घेण्यात आले. महापौर समीर राजूरकर आणि सभापती जालिंदर शेंडगे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. या वेळी ८५० पेक्षा अधिक सफाई कर्मचाऱ्यांनी आरोग्य तपासणी करून घेतली.

स्वच्छतेसोबत जनजागृती

मोहिमेदरम्यान नागरिकांना कचरा सार्वजनिक ठिकाणी न टाकणे, ओला व सुका कचरा वेगळा करणे आणि महानगरपालिकेच्या कचरा संकलन व्यवस्थेचा वापर करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. स्वच्छता ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून नागरिकांचाही तितकाच सहभाग आवश्यक असल्याचा संदेश देण्यात आला.

महात्मा गांधी यांनी स्वच्छतेला सार्वजनिक जीवनात विशेष महत्त्व दिले. त्यांच्या जयंतीदिनी शहरातील विविध घटकांनी एकत्र येत प्रत्यक्ष स्वच्छता करून 'स्वच्छता ही सेवा'चा संदेश दिला. शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी नागरिकांनी स्वच्छतेची सवय दैनंदिन जीवनाचा भाग बनवावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले.

मराठी शाळा बंद करू नका; गुणवत्तावाढीसाठी कृतीआराखडा करा : अभाविप



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

मुंबई : कमी पटसंख्येच्या आधारे मराठी व शासकीय शाळा बंद करण्याऐवजी त्यांच्या गुणवत्तावाढीसाठी स्वतंत्र कृतीआराखडा आणि विशेष कृतीदल स्थापन करावे, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) शिष्टमंडळाने शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांच्याकडे केली.

मंत्रालयात झालेल्या बैठकीत अभाविपच्या वतीने शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणाशी संबंधित विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी प्रवेश प्रक्रिया, शिक्षक भरती, संचमान्यता, मराठी शाळांचे सक्षमीकरण, परीक्षांमधील गैरप्रकार, खासगी शिकवणी वर्ग तसेच ऑनलाइन प्रक्रियेतील अडचणी याबाबत १५ कलमी निवेदनातील मागण्या मांडण्यात आल्या.

टीईटीसह विविध परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच २०१६ मध्ये कोल्हापूर येथे झालेल्या टीईटी प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनेवरील कार्यवाहीचा सविस्तर तपशील उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

इयत्ता ११ वीची प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, ऑनलाइन प्रवेशातील तांत्रिक अडचणी दूर कराव्यात आणि ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रभावी मदत यंत्रणा उभारावी, अशी मागणीही करण्यात आली. शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, टीईटी-टॅट परीक्षांचे वार्षिक वेळापत्रक जाहीर करावे, ग्रामीण शाळांना पायाभूत सुविधा द्याव्यात, तसेच खासगी शिकवणी वर्गांवर नियंत्रण आणावे, यावरही चर्चा झाली. यावेळी अथर्व कुलकर्णी, डॉ. वरुणराज नन्नवरे, शांतनू बिरोजे, अभिषेक पवार, सानिका जोशी, अलका यादव यांच्यासह अभाविपचे पदाधिकारी उपस्थित होते.

रक्षाबंधनाच्या दिवशी दागिन्यांवर डल्ला; दोघे जेरबंद

सिडको पोलिसांची कारवाई; 1 लाख 67 हजारांचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : रक्षाबंधनानिमित्त माहेरी गेलेल्या महिलेच्या घरातून सोन्या-चांदीचे दागिने, मोबाइल व इतर साहित्य असा सुमारे १ लाख ६७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेणाऱ्या दोघांना सिडको पोलिसांनी अटक केली. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली.

शेखर प्रदीप हिवराळे व त्यांची पत्नी पूनम हे २८ सप्टेंबर रोजी रात्री रक्षाबंधनासाठी माहेरी गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी घरातील सोन्याचे मंगळसूत्र, कानातील जोड, चांदीचे पैंजन, मोबाइल व रोख रक्कम असलेली बॅग लंपास केली. याप्रकरणी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान पोलिसांनी बिलाल खान जलाल खान (१९) आणि कैफखान अखिल खान (१९) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल तसेच चोरीचा मोबाइल व चांदीचे पैंजन जप्त करण्यात आले. चोरीतील सोन्याचे दागिने मुंबईतील एका पतसंस्थेत गहाण ठेवून पैसे घेतल्याचे तपासात समोर आले. पोलिस पथकाने मुंबई गाठून संबंधित संस्थेच्या व्यवस्थापकाकडून दागिने जप्त केले. या कारवाईत चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल येरमे च्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाचे अधिकारी व अंमलदारांनी ही कारवाई केली. पुढील तपास पोलीस हवालदार मंगेश पवार करीत आहेत.

उरण येथे महाराष्ट्र ओबीसी कृती समितीची कार्यकारणी बैठक संपन्न

महाराष्ट्रातील 33 ओबीसी जातींच्या केंद्रीय ओबीसी सूचीतील समावेशासाठी पुढील रणनीतीवर होणार चर्चा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण /रायगड : महाराष्ट्रातील ३३ ओबीसी जाती/समाज समूहांचा केंद्र सरकारच्या केंद्रीय ओबीसी सूचीमध्ये समावेश करण्याच्या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या महाराष्ट्र ओबीसी कृती समितीची कार्यकारणी बैठक रविवार, दि.४ ऑक्टोबर २०२६ रोजी उरण, जिल्हा रायगड येथे कराडी समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीत महाराष्ट्रातील संबंधित ओबीसी समाजांना केंद्र सरकारच्या ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याचा आढावा घेण्यात येणार असून, केंद्र व राज्य सरकारकडे करण्यात आलेल्या निवेदने, बैठका, पत्रव्यवहार तसेच पुढील कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

विशेषतः केंद्रीय ओबीसी सूचीतील समावेशाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात नेण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रभावीपणे पाठपुरावा करणे, तसेच या विषयाबाबत विविध ओबीसी समाज संघटनांमध्ये व्यापक जनजागृती करण्यासाठी पुढील दिशा निश्चित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र ओबीसी कृती समितीच्या माध्यमातून या विषयासाठी दिल्ली तसेच महाराष्ट्रात विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. संबंधित समाजांना केंद्र शासनाच्या शैक्षणिक प्रवेश, केंद्रीय सरकारी नोकऱ्या, शिष्यवृत्ती व इतर केंद्रस्तरीय योजनांमध्ये उपलब्ध होणाऱ्या ओबीसी सुविधांचा लाभ मिळावा, हा या प्रयत्नांचा प्रमुख उद्देश आहे.

या कार्यकारणी बैठकीस महाराष्ट्रातील विविध ओबीसी समाजांचे प्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार असून, एकत्रितपणे पुढील कृती आराखडा निश्चित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र ओबीसी कृती समितीचे अध्यक्ष श्रावण फरकाडे व कराडी समाज संघटना यांनी संबंधित सर्व पदाधिकारी व प्रतिनिधींनी बैठकीस उपस्थित राहून आपले विचार व सूचना मांडाव्यात, असे आवाहन केले आहे.रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ ते ४ या वेळेत हॉटेल आनंदी, रेल्वे स्टेशनजवळ, उरण, जिल्हा रायगड येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र ओबीसी कृती समितीचे अध्यक्ष श्रावण फरकाडे व कराडी समाज संघटना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

आचार्य शिवमुनिजींच्या जन्मदिनानिमित्त ऑनलाइन ध्यान शिबिर

15 प्रांत, 3 देशांतील 123 केंद्रांमधून 8500 हून अधिक श्रावक-श्राविका सहभागी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : आचार्य भगवंत डॉ. शिवमुनिजी महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सच्या 'आत्मध्यान प्रसार योजने'तर्फे विशेष ऑनलाइन ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले. २० सप्टेंबर रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत झूम ॲपद्वारे झालेल्या या शिबिरात भारतातील १५ प्रांतांसह तीन देशांतील १२३ आत्मध्यान केंद्रांमधून ८५०० हून अधिक श्रावक-श्राविका तसेच साधू-साध्वी भगवंत सहभागी झाले.

जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय अध्यक्ष अतुलजी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आत्मध्यान योजनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शशिकुमार 'पिंटू' कर्णावट जैन यांच्या नेतृत्वाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी पिंटू कर्णावट यांनी आचार्य भगवंतांना जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. श्रमण संघीय प्रमुख मंत्री शिरीष मुनिजी महाराज यांनी ध्यानाचे आध्यात्मिक महत्त्व विशद केले. निशाजी यांनी सामूहिक ध्यान व आलोचना करवून घेतली. आचार्य डॉ. शिवमुनिजी महाराज यांनी ध्यानसाधनेचे महत्त्व सांगत साधकांना मार्गदर्शन केले. मंगल मैत्री व मंगल पाठाने शिबिराची सांगता झाली.

बाबरा येथे गांधी-शास्त्री जयंतीनिमित्त ग्रामस्वच्छता मोहीम

'सेवा संकल्प अभियान'अंतर्गत ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग; विशेष ग्रामसभेत गावाच्या विकासावर चर्चा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : फुलंब्री तालुक्यातील बाबरा येथे महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त विशेष ग्रामसभा घेण्यात आली. ग्रामसभेनंतर 'सेवा संकल्प अभियान' आणि 'संकल्प ३६५ दिवसांचा' उपक्रमांतर्गत संपूर्ण गावात ग्रामस्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. ग्रामसभेत गावाच्या विकासासह स्वच्छतेचे महत्त्व, नागरिकांचा सहभाग आणि विविध सामाजिक उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांनी एकत्र येत गावातील विविध भागांची स्वच्छता केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.



तसेच समाजातील विविध घटकांसाठी वर्षभर विविध सेवाभावी उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने 'संकल्प ३६५ दिवसांचा' या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, ग्रामपंचायत अधिकारी समाधान वाघ, ग्राम महसूल अधिकारी भगवान ढोरमारे, विठ्ठल पाथ्रे, राजेंद्र चव्हाण, डॉ. मिनजोद्दीन शेख, प्रभाकर वाघ, रामभाऊ पवार, राहुल भिवसने, प्रवीण वाघ, शुभम पवार, समाधान पवार, डॉ. अंबादास काथार, रवी भिवसाने, नामदेव पवार, वंदना काथार, रिजवान पठाण, सीमा बर्डे यांच्यासह जिल्हा परिषदेचे शिक्षक, अंगणवाडी सेविका, महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत स्वच्छता व सेवाभावी उपक्रमांमध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी



बोरघर,माणगाव रायगड : दिनांक २/१०/२०२६ माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान, माजी रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन अध्ययन व विस्तार कार्य विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली.

हा कार्यक्रम माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. ॲड. राजीव साबळे साहेब यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ पत्रकार तथा सुधाकर नारायण शिपूरकर इंग्लिश मीडियम स्कूलचे चेअरमन यांनी भूषविले. या कार्यक्रमात सिमरन वाडेकर,रीम गजगे, यश कोठारी या विद्यार्थ्यांनी तसेच उपप्राचार्य प्रा.डॉ.राजेंद्र आचार्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयशंकर पांडेय यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री या महापुरुषांचे महान विचार आणि कार्य, त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात, देशाच्या उभारणीत व विकासासाठी दिलेल्या योगदान यावर विचार मांडले. या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून इतिहास विषयाचे प्रा. दीपेश केकाणे यांनी लिहिलेल्या 'भारतीय ज्ञान प्रणाली - वैद्यकशास्त्र' या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले आणि 'एक दिन, एक घंटा, एक साथ' हे स्वच्छता अभियान महाविद्यालयात राबविण्यात आले. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सुस्मिता म्हामुणकर, आजीवन अध्ययन आणि विस्तार कार्य विभाग प्रमुख डॉ.संगीता उतेकर, तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातील आणि आजीवन अध्ययन व विस्तार कार्य विभागातील सर्व सदस्य, महाविद्यालयातील इतर प्राध्यापक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.विशाखा पवार, प्रा. सुष्मिता म्हामुणकर, प्रा. शाश्वती महाडिक प्रा. प्रगती गोरेगावकर प्रा. साक्षी साठे, प्रा. स्वप्निल सपकाळ आणि विद्यार्थी केतन खेडेकर, यश गुजर, यांनी परिश्रम घेतले.

महानगरपालिकेत महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आज विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात शहरातील शाहगंज येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. महापौर समीर राजूरकर आणि स्थायी समिती सभापती अनिल मकरीये यांनी महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या सोहळ्यात गलिच्छ वस्ती सुधार समिती सभापती जालिंदर शेंडगे, नगरसेवक ऋषिकेश जयस्वाल, सचिन खैरे, मनपा आयुक्त अमोल येडगे, उपायुक्त नंदकिशोर भोंबे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्ज्वला भामरे, मुख्य उद्यान अधिकारी विजय पाटील, सहाय्यक आयुक्त रमेश मोरे, जनसंपर्क अधिकारी अहमद तौसीफ यांच्यासह मनपाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाहगंज येथील कार्यक्रमानंतर महानगरपालिका मुख्यालयात माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911